क्र.का.5/मुद्रांक-17/सं.क्र.17/17/ 175 /2017
नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे - 1.
दिनांक - 27/02/2017.

6

## विषयः मुद्रांक विक्रेता परवाना नुतनीकरण

**परिपत्रकः-**

राज्यातील मुद्रांक विक्रेत्यांच्या परवान्यांचे नुतनीकरण करण्यासाठी संबंधित परवानाधारकाबाबत 'पोलीस पडताळणी अहवाल' घेतला जातो. प्रचलित कार्यपध्दतीनुसार, या करीता सदर परवानाधारकास संबंधित पोलीस स्टेशनकडे अर्ज करावा लागतो.

यासंदर्भात राज्यातील मुद्रांक विक्रेत्यांच्या संघटनांनी या कार्यालयाकडे व शासनाकडे केलेल्या मागणीचा विचार करुन तसेच या संदर्भात शासनस्तरावरुन झालेल्या चर्चेमधील निर्णय विचारात घेवून या संदर्भात राज्यातील सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी यांना सुचना देण्यात येत आहेत की, मुद्रांक विक्रेत्यांचे परवाने नुतणीकरण करण्यासाठी आवश्यक असलेला पोलीस पडताळणी अहवाल मिळण्याविषयी मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयानेच संबंधित पोलीस स्टेशन यांचेकडे पत्रव्यवहार करावा व पडताळणीबाबतचे अहवाल प्राप्त करुन घ्यावेत. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी परवान्यांची मुदत संपण्यापुर्वी किमान 3 ते 4 आठवडे अगोदर सदर पत्रव्यवहार करावा, जेणेकरुन परवान्याच्या नुतनीकरणाबाबतचा निर्णय प्रलंबीत राहणार नाही.

सही/-
(डॉ. रामास्वामी एन)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति-

सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी

प्रत-

1) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
2) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
3) सर्व कार्यासन अधिकारी

निर्गमित

नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय),
महाराष्ट्र राज्य, पुणे.